महाराष्ट्र शासन
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९१२३९१४
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक:एमआयएस-१०२०/सीआर-१९/२०२२/मा.तं. दिनांक:- ६ डिसेंबर, २०२३

## -: प्रसिध्दीपत्रक :-

**विषय:- पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा पूर्व परीक्षा २०२३ (जा.क्र.०५२/२०२३)**
**- प्रवेश प्रमाणपत्राबाबत**

**संदर्भ:-** (१) आयोगाच्या कार्यालयाचे समक्रमांकाचे दिनांक २४ नोव्हेंबर, २०२३ रोजीचे प्रसिध्दीपत्रक
(२) आयोगाच्या कार्यालयाचे शुध्दीपत्रक क्रमांक एलटीडी-३४१७/सीआर-१४/२०१७/जाहिरात, दिनांक २९ नोव्हेंबर, २०२३

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत शनिवार, दिनांक २ डिसेंबर, २०२३ रोजी नियोजित पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा पूर्व परीक्षा २०२३ आयोगाच्या संदर्भिय दिनांक २९ नोव्हेंबर, २०२३ रोजीच्या शुध्दीपत्रकान्वये पुढे ढकलण्यात येऊन प्रस्तुत परीक्षा **रविवार, दिनांक १० डिसेंबर, २०२३** रोजी घेण्यात येणार असल्याचे सूचित करण्यात आले आहे.

**२.** प्रस्तुत परीक्षेकरीता उमेदवारांना आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे संदर्भिय दिनांक २४ नोव्हेंबर, २०२३ रोजीच्या प्रसिध्दीपत्रकानुसार प्रवेश प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली आहेत. सदर प्रवेश प्रमाणपत्रावर परीक्षेचा दिनांक २ डिसेंबर, २०२३ नमूद असून त्याआधारेच उमेदवारांना दिनांक १० डिसेंबर, २०२३ रोजी प्रवेश प्रमाणपत्रामध्ये नमूद परीक्षा उपकेंद्रावर प्रवेश देण्यात येईल.

**३.** परीक्षा कक्षात प्रवेश मिळविण्यासाठी आयोगाच्या संकेतस्थळावरुन डाऊनलोड करुन प्रिंट केलेले मूळ स्वरुपातील प्रवेश प्रमाणपत्र सोबत आणणे अनिवार्य आहे. त्याशिवाय परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

**४.** प्रवेशप्रमाणपत्र मिळविण्यात कोणतीही अडचण उद्भवल्यास उमेदवारास आयोगाच्या contact-secretary@mpsc.gov.in व support-online@mpsc.gov.in या ईमेल व/अथवा १८००-१२३४-२७५ किंवा ७३०३८२१८२२ या दूरध्वनी क्रमांकावरुन विहित वेळेत आवश्यक मदत प्राप्त करुन घेता येईल.

**५.** परीक्षेच्या आयोजनासंदर्भात आयोगाकडून वेळोवेळी व विविध पध्दतीने दिलेल्या सर्व सूचनांचे उमेदवारांनी तंतोतंत पालन करणे अनिवार्य आहे. आयोगाच्या सूचनांचे तंतोतंत पालन न करणा-या तसेच परीक्षेच्या प्रवेशासंदर्भात कोणत्याही कारणास्तव कोणत्याही प्रकारे दबाव आणण्याचा प्रयत्न करणा-या उमेदवारांवर आयोगाच्या स्वेच्छाधिकारानुसार प्रतिरोधनाची (Debar) कारवाई करण्यात येईल. तसेच, संबंधित व्यक्ती शिस्तभंगविषयक कारवाईस पात्र असेल.

ठिकाण: मुंबई

सहसचिव, माहिती तंत्रज्ञान
महाराष्ट्र लोकसेवा आयोग